**महाराष्ट्र राज्यातील सहा विभागीय क्षेत्रात ई-सेवा केंद्र स्थापीत करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मातंसं/०४७/१/२०१४/३९**
७ वा मजला, मंत्रालय
मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०५ सप्टेंबर, २०१४

<u>वाचा:</u>- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मातंसं/प्र.क्र.२८/३९ दि. ३ डिसेंबर,२००८

<u>प्रस्तावना :-</u>

राज्यातील जनतेला शासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवा (G2C) व्यवसायिकांकडून देण्यात येणाऱ्या सेवा (B2C) अशा प्रकारच्या सेवा नजिकच्या ठिकाणी जलदगतीने व विनासायास उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात ग्रामीण आणि शहरी भागात एकून ११८१९ महा-ई-सेवा केंद्र (CSC) उपरोक्त संदर्भाधीन दि. ३.१२.२००८ च्या शासन निर्णयान्वये स्थापीत करण्यात अलेली आहेत. त्यानुसार शासन निर्णयाच्या परिशिष्ठ क्र. ५(२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा महा-ई-सेवा केंद्र मंजूर करण्यात आलेली आहेत. जिल्हा निहाय महा-ई-सेवा केंद्राची संख्या निश्चीत करण्यासाठी त्यांनी त्यावेळी जिल्हयांची जून २००१च्या जनगनणेनुसार अखोली लोकसंख्या विचारात घेण्यात आलेली आहे. आता सन २०११ च्या जनगणनेच्या आधारे महा-ई-सेवा केंद्राची संख्येत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २००१ च्या जनगणेच्या तलनेत सन २०११ च्या जनगणेत लोकसंख्येत झालेला बदल लक्षात घेवून, दि. ३.१२.२००८ अन्वये मंजूर केलेल्या महा-ई-सेवा केंद्राच्यासंख्येत खालीलप्रमाणे बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(I) ज्या जिल्हयात लोकसंख्येत २५ किंवा त्यापेक्षा जास्त वाढ झालेली असेल तर, मंजूर महा-ई-सेवा केंद्राच्या संख्येत २० %टक्के वाढ

(II) ज्या जिल्हयातील लोक संख्येत घट झालेली असेल तर त्या जिल्हयातील महा-ई केंद्राच्या संख्येत कोणाताही बदल नाही.

(III) अन्य २५ पेक्षा कमी लोकसंख्येतील वाढ असलेल्या जिल्हयामध्ये मंजूर महा-ई-सेवा केंद्राच्या १० वाढ करण्यात यावी.

(IV) स्थानिक गरजे नुसार या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या महा-ई-सेवा केंद्राच्या संख्येत १० च्या मर्यादेत राहुन वाढ किंवा घट करण्याचा अधिकारी यथास्तीती जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त यांना राहतील.

२. वरील धोरणानुसार रात्री सन २०११ च्या जनगणणे नुसार लोक संख्येत झालेली वाढ आणि त्या आधारे निर्धारीत केलेल्या महा-ई-सेवा केंद्राची संख्या या शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट “अ” च्या स्तंभ क्र. ७ मध्ये नमूद केलेली आहे.

३. हा शासन निर्णय राज्य सेतू सोसायटीच्या दि. २४ जुलै,२०१४ च्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमीत करण्यात येंत आहे.

४. हा शासन निरर्ण महाराष्ट्र रा राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलबध आहे. त्यांचा संगणक संकेतांक २०१४०९०५१३५४२२८६११ असा आहे. आदेशान्वये

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chavan Pradip Girdhar

Digitally signed by Chavan Pradip Girdhar
DN: c=IN, o=Govt. of Maharashtra, ou=Directorate of Information Technology, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Chavan Pradip Girdhar
Date: 2014.09.05 16:42:04 +05'30'

**(प्रदिप चव्हाण)**
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग (मातं)

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
६. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी

परिशिष्ठ- अ

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या (२००१ ची जनगनणा) | लोकसंख्या (२०११ ची जनगनणा) | लोकसंख्येत झालेली वाढ % | महाईसेवा केंद्रांची संख्या दि. ३.७.२००८ (शा.नि.दि.३/१२/२००८ प्रमाणे) | महा-ई-सेवांकर (सन २०११ च्या जनगनणेप्रमाणे ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | अहमदनगर | ४०६४२ | ४५४३०८३ | १२.४३ | ३२६ | ३५९ |
| २. | अकोला | १६३०२३९ | १८६१७ | ११.५६ | २७० | २९७ |
| ३. | अमरावती | २६०७१६० | २८८७८२६ | १०.७७ | ५४६ | ६०१ |
| ४. | औरगाबाद | २८९७०१३ | ३६९५९२८ | २७.५८ | ३८१ | ४५७ |
| ५. | बीड | २१६१२५० | २५८५९६२ | १९.६५ | ३७८ | ४१६ |
| ६. | भडारा | ११३६१४६ | ११९८८१० | ५.५२ | २४२ | २६६ |
| ७. | बुलढाणा | २२३२४८० | २५८८०३९६ | १५.९३ | ४०१ | ४४१ |
| ८. | चद्रपुर | २०७११०१ | २१९४२६२ | ५.९५ | ४८९ | ५३८ |
| ९. | धुळे | १७०१९४७ | २०४८७८१ | १९.९६ | १३६ | १५० |
| १०. | गडचिरोली | ९७०२९४ | १०७१७९५ | १०.४६ | ४५९ | ५०५ |
| ११. | गोदिया | १२००७०७ | १३२२३३१ | १०.१३ | २६४ | २९० |
| १२. | हिंगोली | ९८७१६० | ११७८९७३ | १९.४३ | १९५ | २१५ |
| १३. | जळगाव | ३६८२६९० | ४२२४४४२ | १४.७१ | ३१२ | ३४३ |
| १४. | जालना | १६१२९८० | १९५८४८३ | २१.४२ | २७० | २९७ |
| १५. | कोल्हापुर | ३५२३१६२ | ३८७४०१५ | ९.९६ | ३४४ | ३८७ |
| १६. | लातुर | २०८०२८५ | २४५५५४३ | १८.०४ | २६९ | २९६ |
| १७. | मुबई सिटी | ३३३२०३१ | ३१४५९६६ | ५.७५ | ७५ | ७५ |
| १८. | मुबई सबरबन | ८६४०४१९ | ९३३२४८१ | ८.०१ | ७५ | ८३ |
| १९. | नागपूर | ४०३७६३७ | ४६५३१७१ | १४.३९ | ५२८ | ५८१ |
| २०. | नादेड | २८७६८५९ | ३३५६५६६ | १६.७ | ४५३ | ९९८ |
| २१. | नदूरबार | १३११७०९ | १६४६१७७ | २५.५ | १८९ | २०८ |
| २२. | नाशिक | ४९९३७९६ | ६१०९०५२ | २२.३३ | ३९८ | ४६८ |
| २३. | उस्मानाबाद | १४८६५८६ | १६६०३११ | ११.६९ | २१० | २३१ |
| २४. | परभणी | १५२७७१५ | १८३५९८२ | २०.२८ | २४० | २६४ |

| अ.क्र. | जिल्हा | लोकसंख्या (२००१ ची जनगणना) | लोकसंख्या (२०११ ची जनगणना) | लोकसंख्येत झालेली वाढ % | महाईसेवा केंद्रांची संख्या दि. ३.७.२००८ (शा.नि.दि.३/१२/२००८ प्रमाणे) | महा-ई-सेवांकर (सन २०११ च्या जनगनणेप्रमाणे ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २५. | पुणे | ७२३२५५५ | ९४२६९५९ | ३०.३४ | ५२७ | ६३१ |
| २६. | रायगड | २२०७९२९ | २६३५३९४ | १९.३६ | ५२८ | ५८१ |
| २७. | रत्नागिरी | १६९६७७७ | १६१२६७२ | ४.९६ | ४१६ | ४१६ |
| २८. | सागली | २५८३५२४ | २८२०५७५ | ९.१८ | २१२ | २३३ |
| २९. | सातारा | २८०८९९४ | ३००३९२२ | ६.९४ | ४७१ | ५१८ |
| ३०. | सिधुदूर्ग | ८६८८२५ | ८४८८६८ | २.३ | २१३ | २१३ |
| ३१. | सोलापूर | ३८४९५४३ | ४३१५५२७ | १२.१ | ३३३ | ३६६ |
| ३२. | ठाणे | ८१३१८४९ | ११०५४१३१ | ३५.९४ | ४९७ | ५९६ |
| ३३. | वर्धा | १२३६७३६ | १२९१५७ | ४.८ | ३७२ | ४०९ |
| ३४. | वाशिम | १०२०२१६ | ११९६७१४ | १७.३ | २१९ | २४१ |
| ३५. | यवतमाळ | २४५८२७१ | २७७५४५७ | १२.९ | २८४ | ६४२ |
|  | एकूण | ९६८७८६२७ | ११२३७२९७२ |  | ११८२२ | १३०७४ |